रजिस्टर्ड नं. एनजीपी-४

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

नं. २० ]    बुधवार, दिनांक ३० ऑगस्ट २०००/भाद्रपद ८, शके १९२२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग ४-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.), (ना वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५६

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई, दिनांक ३० ऑगस्ट, २०००

**नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८**

क्रमांक नामपा २३००-१११५-प्रक्र-१३७-२०००-नवि-२६.–

नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २) च्या कलम ४१८ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी उक्त अधिनियमाच्या कलम २०१ च्या पोटकलम (२) खाली तयार केलेले नागपूर महानगरपालिकेच्या पाणीपट्टी दराचे मुल्यांकन आणि वसुली उपविधी, १९६६ ज्याला कलम ४१७ अन्वये आवश्यक ती पूर्व प्रसिद्धी देण्यात आली आहे असे उपविधी कायम करून उक्त अधिनियमाच्या कलम ४१९ अनुसार महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

(१) या उपविधींना नागपूर शहर महानगरपालिका पाणीपट्टी दर, मुल्यांकन आणि वसुली (दुरुस्ती) उपविधी, २००० असे म्हणावे.

(२) नागपूर शहर महानगरपालिका पाणीपट्टी दराचे मुल्यांकन आणि वसुली उपविधी, १९६६ (यापुढे यास '' मुख्य उपविधी '' असे संबोधण्यात यावे), उपविधी ६ मधील उप-कलम (ब) आणि (क) ऐवजी खालील उप-कलम समाविष्ट करण्यात यावीत.

'' (ब) ज्या ग्राहकाच्या पाण्याच्या नळास मीटर जोडलेले नाही, परंतु त्याची जोडणी अधिकृत आहे अशा ग्राहकास खालीलप्रमाणे दर आकारण्यात येतील :–

| जोडणीचे माप | दर निवासी | दर अनिवासी |
|---|---|---|
| १५ मि. मि. व्यास .. .. .. | रुपये ७५ | रुपये ३०० |
| २० मि. मि. व्यास .. .. .. | रुपये १५० | रुपये ६०० |
| २५ मि. मि. व्यास .. .. .. | रुपये ३५० | रुपये २,००० |

परंतु, हे दर प्रतिमाह प्रति घर किंवा एकक (गाळा) असतील.